

महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड २, अंक ३ जुलै २०२१ (क्र.६)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३

काळ्या ढगाची रुपेरी किनार

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ४

गौताळा अभयारण्यात पुरेशा मनुष्यबळाअभावी वाघावर देखरेखीचे काम अवघड

जायकवाडी पक्षी अभयारण्य ४

नव्या पाणीपुरवठा योजनेसाठी मुख्य पंप हाऊसचे काम जायकवाडी पक्षी अभयारण्यात

ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य ४

ठाणे खाडीसह रायगड जिल्ह्यातील खाडी, समुद्रकिनारी फ्लेमिंगोंचा वर्षभर मुक्काम

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ५

ताडोब्याच्या गाभा क्षेत्रातील पर्यटन पावसाळ्यात बंद

ताडोबा अंधारीलगतच्या दोन गावांच्या पुनर्वसन प्रस्तावाची मुख्यमंत्र्यांकडून मागणी

तुंगारेश्वर अभयारण्य ६

तुंगारेश्वर अभयारण्यात सदानंद बाबा आश्रमाचे बेकायदा बांधकाम सुरूच

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ६

काळ्या बिबट्यापाठोपाठ नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात दिसली ‘रस्टी स्पॉटेड कॅट’

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प/पेंच व्याघ्र प्रकल्प ६

नागझिरा व पेंच व्याघ्र प्रकल्पांदरम्यानच्या क्षेत्रात तीन वाघांचा संचार

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ७

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राण्यांचे उपचार केंद्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्याअभावी बंद

राष्ट्रीय बांबू अभियानाचा निधी मेळघाट प्रतिष्ठानाकडे पडून

‘ट्रोपिझोडीअम विरिदुर्बिअम’ कोळयाच्या नराचे पहिल्यांदाच मेळघाटात दर्शन

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ८

हिमालयातील गिधाडाची सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात नोंद

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ८

आरे दुग्ध वसाहतीतील वनासाठी राखीव केलेल्या जागेचे वन विभागाकडे हस्तांतरण

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान/तुंगारेश्वर अभयारण्य ९

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व तुंगारेश्वर अभयारण्यात अनेक ठिकाणी वाघोबाची देवळे

**राज्यस्तरीय बातम्या** ९

बुद्ध पौर्णिमेची प्राणिगणना कोविड साथीमुळे सलग दुसऱ्या वर्षी रद्द

शिकारीसाठी लावलेल्या वीजेच्या तारा शोधण्यासाठी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या उपकरणाचा राज्यातील पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये वापर

कोळयाच्या नव्या जातीला पोलीस कर्मचारी तुकाराम ओंबळे यांचे नाव

डॉ. माधव गाडगीळ यांच्या सन्मानार्थ बांबूच्या जातीचे नामकरण

पश्चिम महाराष्ट्र

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील जंगलांत ९७ शेकरू

कोरोना संसर्गाची शक्यता लक्षात घेऊन माणिकडोह निवारा केंद्रातील बिबट्यांची विशेष काळजी

विदर्भ

विदर्भातील भंडारा, गोंदियासह मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात सारस क्रौंच पक्ष्याचे अस्तित्त्व धोक्यात

मध्य चांदा वन विभागाच्या प्रयत्नांमुळे विभागात यंदा उन्हाळ्यात माणूस-वन्यजीव संघर्ष आटोक्यात
भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरी वगळता राज्यात इतरत्र विहिरींना कठडे बांधण्याची योजना कागदावरच
यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यात विहिरीत पडलेल्या १५ नीलगायींची सुटका
कोकण
राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर वर्ष २०२०-२१ मध्ये ऑलिव रिडले कासवांच्या घरट्यांच्या संख्येत वाढ
सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावांमध्ये हत्तीची भीती; बागायतीचेही नुकसान
आंबोली गावात 'इस्चिमम' प्रजातीच्या गवताची नवी जाती
सिंधुदूर्ग जिल्ह्यात वाघाच्या अस्तित्त्वाचा ठोस पुरावा; स्वयंचलित कॅमेऱ्याने टिपले वाघाचे छायाचित्र
माणूस-बिबट्या संघर्ष १६
राज्यात साडेचार महिन्यांत ८७ बिबट्यांचा मृत्यू
औरंगाबाद जिल्ह्यात चार वर्षांत १९ बिबट्यांचा मृत्यू
नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी वन विभागात माणूस-बिबट्या संघर्षावर 'कार्बाईड गन'चा उपाय
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १७
माणूस-वाघ संघर्ष १८
भारतात यंदा ८६ वाघांचा मृत्यू; महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर
विदर्भातील कृषी क्षेत्र वाघांना अनुकूल
गुहेत कोंडून जिवंत जाळून वाघिणीची शिकार; आरोपींना अटक; अटक अन्यायकारक असल्याचा ग्रामस्थांचा दावा
यवतमाळ जिल्ह्यातील झरी वन परिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात दोन जखमी
गडचिरोली जिल्ह्यात आठवडाभरात वाघाच्या हल्ल्यांत तीन महिला ठार
चंद्रपूर जिल्ह्यात यंदा माणूस-वाघ संघर्ष अधिक तीव्र

**राष्ट्रीय बातम्या** २१
केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने १९२७ च्या वन कायद्यात सुधारणा करण्यासाठी निविदा मागवल्या
वन कर्मचाऱ्यांना पहिल्या फळीतील कोविड योद्ध्यांचा दर्जा देण्याची मागणी

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २२
माणूस-वन्यजीव संघर्षाची व्याप्ती जगभर; संरक्षित क्षेत्र अवघे ९.६७ टक्केः अहवाल

**दृष्टीकोन** २४
जैवविविधता कायदा आणि वन्यजीव संरक्षण

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड २, अंक ३, जुलै २०२१ (क्र. ६)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ताः** C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेलः**marathipaupdate@gmail.com **संकेतस्थळः** http://kalpavriksh.org

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

## संपादकीय

### काळ्या ढगाची रुपेरी किनार

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या जानेवारी २०२१ च्या अंकातील संपादकीय 'वन्यजीवन- आतले 'अधिक' बाहेरचे'मध्ये मांडलेली संरक्षित क्षेत्रांबाहेरचे वन्यजीवन ही जागतिक पातळीवरील समस्या आहे. तीच बाब माणूस-वन्यप्राणी संघर्षाची. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशांमध्येच हा संघर्ष आहे, असे नव्हे; तर जगात सर्वत्र हा संघर्ष आहे. या समस्यांचा इथे पुन्हा उल्लेख करण्याचे कारण की 'डब्ल्यू. डब्ल्यू. एफ.' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि संयुक्त राष्ट्रसंघाचा पर्यावरण संरक्षणासाठी कार्यरत विभाग – 'यू. एन. ई. पी.' यांनी एकत्र येऊन प्रकाशित केलेल्या अहवालात या बाबी पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या आहेत.

माणूस-वन्यजीव संघर्षात वरकरणी माणसाचे पारडे जड ठरत असले तरी वन्यजीवांचा विनाश हा अखेरीस माणसाच्या अस्तित्त्वावर उठणार हे निश्चित आहे. माणूस-वन्यजीव संघर्षाचे हे जगद्व्यापी चित्र जाणकार आणि संवेदनशील माणसांना निराशाजनक वाटते हे खरे. मात्र, निराशेच्या या मोठ्या ढगाला छोटीशी रुपेरी किनार आहे; ती इथे महाराष्ट्रातच यावेळी दिसून येत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वाघ संघर्ष टीपेला पोहोचला असताना या जिल्ह्यातील एका वन विभागात संघर्ष आटोक्यात ठेवून त्यात माणूस आणि वाघ दोहोंचे बळी जाणार नाहीत, असे व्यवस्थापन एका उप वन संरक्षकांनी यशस्वी करून दाखवले आहे. मध्य चांदा वन विभागात वर्षभरापूर्वी उप वन संरक्षक म्हणून अरविंद मुंढे आले. तेव्हापासून त्यांनी विभागातील १६० अधिकारी, कर्मचारी आणि तीनेकशे गावांतील रहिवाशांना विश्वासात घेऊन माणूस-वाघ संघर्षावर उपाययोजना करण्यास सुरुवात केली. या उपाययोजनांचा परिणाम म्हणून मध्य चांदा वन विभागात यंदाच्या मोहफूल, तेंदूपत्ता वेचण्याच्या हंगामात वाघाच्या हल्ल्यात एकाही माणसाचा मृत्यू झाला नाही व वन्यप्राण्याच्या शिकारीची घटना घडली नाही. खेरीज, या हंगामात सर्वसाधारणपणे लागणारे किंवा लावले जाणारे वणवे, बेकायदा जंगलतोड, वन विभाग विरुद्ध ग्रामस्थ संघर्ष अशा एकाही घटनेची नोंद झालेली नाही.

दुसरी बातमी आहे ती उघड्या विहिरींमध्ये पडल्यामुळे होणारे वन्यप्राण्यांचे मृत्यू टाळण्यासाठी केलेल्या उपाययोजनेची. भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरीचे वन परिक्षेत्र अधिकारी नितेश धनविजय यांनी पुढाकार घेतला आणि सरकारी योजनांतर्गत दहा लाख रुपयांचा निधी मिळवून सुमारे ३९ विहिरींना कठडे बांधले. परिणामी, २०१९-२० या कालावधीत या विहिरींवर कठडे बांधून झाले, तेव्हापासून आजतागायत या परिसरात वन्यप्राणी विहिरीत पडल्याची एकही घटना घडलेली नाही.

तिसरी बातमी आहे ती साध्या, सोप्या पण खूप महत्त्वाच्या संशोधनाविषयीची. वीजेच्या तारांमुळे केली जाणारी वन्यप्राण्यांची शिकार, होणारे मृत्यू टाळता यावेत, यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी जिवंत विद्युतप्रवाह शोधण्यासाठी एक उपकरण तयार केले. त्याचा महाराष्ट्रातील पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर वापर केला जाणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी वन विभागाने शेतकऱ्यांच्या मदतीने शेतमळ्यात सहज उपलब्ध असलेले साहित्य वापरून मोठा आवाज करणारी कार्बाईड गन तयार केली आहे. तूर्तास बिबट्याला पळवून लावण्यासाठी तिचा उपयोग होत आहे.

उपलब्ध पर्याय आणि साधनसंपत्तीला इच्छाशक्तीची जोड देत उपरोक्त घटनांमध्ये तीन ठिकाणी वनाधिकाऱ्यांनी आपापल्या अधिकारांत बदल घडवून आणला; तर अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कौशल्याच्या आधारे व्यावहारिक पातळीवर संवर्धनासाठी उपयुक्त ठरेल असे संशोधन यशस्वी केले.

धोरणात्मक बदल – कधी बरे कधी वाईट - एकीकडे होत राहतील. मात्र, आहे त्या चौकटीत, उपलब्ध साधनसंपत्तीचा, आपापल्या अधिकारांचा – मग ते मर्यादित का असेना – वापर करून समाजातील सर्व स्तरांतील भागीदारांना एकत्र आणून व्यावहारिक उपाय शोधणे, त्यांची अंमलबजावणी करणे, अंमलबजावणीदरम्यान लक्षात आलेल्या चुकांमधून शिकत पुढे जाणे, हेच तर नेमके माणूस-वन्यजीव संघर्षावर उपाययोजना करण्यासाठी अपेक्षित आहे.

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### गौताळा औट्रमघाट अभयारण्य

**गौताळा अभयारण्यात पुरेशा मनुष्यबळाअभावी वाघावर देखरेखीचे काम अवघड**

औरंगाबाद जिल्ह्यातील गौताळा वन्यजीव अभयारण्यात ८१ वर्षांनंतर आढळलेल्या वाघावर लक्ष ठेवण्यासाठी अभयारण्य प्रशासनाकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. त्यामुळे या वाघावर देखरेख ठेवणे अवघड झाले आहे.

टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातून हा वाघ गौताळ्यात आला आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र.* ५). गौताळ्यात त्याच्यासाठी पुरेसे भक्ष्य उपलब्ध असल्याचे गौताळा प्रशासनाने सांगितले.

गौताळा अभयारण्यात कन्नड, नागड आणि चाळीसगाव अशी तीन वन क्षेत्रे आहेत. पैकी ६,५०० हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या चाळीसगाव वन क्षेत्रात वन क्षेत्रपालाचे एक आणि वन रक्षकाची दोन पदे रिकामी आहेत. त्यामुळे वाघाच्या हालचालींवर सातत्याने देखरेख ठेवणे अशक्य झाले आहे, असे प्रशासनाने सांगितले.

**सूत्र** - 'Staff crunch affecting Gautala tiger tracking: Maha official', www.outlookindia.com, २१.०६.२०२१.

### जायकवाडी पक्षी अभयारण्य

**नव्या पाणीपुरवठा योजनेसाठी मुख्य पंप हाऊसचे काम जायकवाडी पक्षी अभयारण्यात**

राज्य शासनाने औरंगाबादसाठी १६८० कोटींची नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे. या योजनेत सातारा-देवळाई-गुंठेवारी भागांसह संपूर्ण शहराला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, या योजनेसाठी जायकवाडी पक्षी अभयारण्यात काम करावे लागणार असल्यामुळे राज्य शासनाला केंद्र सरकारकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' घ्यावे लागणार आहे.


फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कंत्राट घेतलेल्या कंपनीने या योजनेचे काम सुरू केले. मात्र, योजनेचा भाग म्हणून जायकवाडीच्या नाथसागरात सुमारे एक ते दीड किलोमीटर आत जाऊन मुख्य पंप हाऊसचे काम करावे लागणार आहे. ज्या ठिकाणी हे काम केले जाणार आहे तो संपूर्ण परिसर पक्षी अभयारण्याचा भाग आहे.

औरंगाबाद शहराचे महत्त्व, या शहराची लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने पक्षी अभयारण्याच्या क्षेत्रात पाणीपुरवठा योजनेच्या कामाला परवानगी द्यावी, अशी विनंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केली आहे. परंतु अद्याप ही परवानगी मिळालेली नाही.

**सूत्र** - उन्मेष देशपांडे. 'पक्षी अभयारण्याचा पाणीपुरवठा योजनेला केंद्र सरकारचा अडथळा', maharashtratimes.com, १७.०५.२०२१.

### ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य

**ठाणे खाडीसह रायगड जिल्ह्यातील खाडी, समुद्रकिनारी फ्लेमिंगोंचा वर्षभर मुक्काम**




ठाणे खाडीत फ्लेमिंगो (रोहित) पक्ष्यांचा वर्षभर वावर असून परिसरातील पोषक वातावरणामुळे ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील विशेषतः उरण खाडी व समुद्रकिनारी मोक्याची

जागा बघून ते कायमस्वरूपी स्थिरावू लागले आहेत, असे पक्षी अभ्यासकांचे मत आहे.

ठाणे खाडीत फ्लेमिंगोंची संख्या वाढते आहे, याबाबत अभ्यासकांमध्ये एकमत असले तरी त्यामागील कारणांबाबत मतेमतांतरे आहेत. ठाणे खाडी परिसरात येणारे फ्लेमिंगो प्रजननासाठी पावसाळ्याचे काही दिवस अगोदर उड्डाण करून कच्छच्या रणात जात; मात्र आता ते ठाणे, रायगड परिसरात स्थिरावण्याचा प्रयत्न करत असावेत. खाडी परिसरात त्यांचे खाद्य - शेवाळ विपुल प्रमाणात आहे. त्यामुळे खाडी परिसरात वर्षाचे बाराही महिने फ्लेमिंगो दिसत असल्याचे पक्षी अभ्यासकांनी सांगितले. काही पक्षी अभ्यासकांच्या मते त्यांचे हिवाळ्यात उशिरा आगमन झाल्यामुळे ते अद्याप इथे दिसत आहेत; तर काही अभ्यासकांच्या मते पाच ते दहा टक्के पक्षी परतीचा प्रवास करणे टाळतात.


**सूत्र** - प्रशांत सिनकर. 'ठाणे खाडी, उरण परिसरात फ्लेमिंगोंच्या मुक्कामात वाढ', maharashtratimes.com, २८.०५.२०२१.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोब्याच्या गाभा क्षेत्रातील पर्यटन पावसाळ्यात बंद

कोरोना विषाणूचा संसर्ग कमी झाल्यानंतर २५ जून रोजी उघडण्यात आलेले ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील गाभा क्षेत्राचे सहाही दरवाजे एक जुलैपासून बंद करण्यात आले आहेत. पावसाळ्यात रस्ते खराब होत असल्याने प्रकल्प प्रशासनाने हा निर्णय घेतला. गाभा क्षेत्रातील पर्यटन एक ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू करण्यात येईल. मात्र, बफर क्षेत्रातील सर्व - १३ दरवाजे पावसाळ्यातही खुले राहणार आहेत.

राज्यात कोरोनाची दुसरी लाट आली असताना सुरक्षेचा उपाय म्हणून १५ एप्रिलपासून वन्यजीव पर्यटन बंद करण्यात आले. त्यानंतर जून महिन्याच्या मध्यात सारे काही पूर्वपदावर येत असताना व्याघ्र पर्यटनासाठी ताडोब्याचे दरवाजे खुले करण्याची मागणी केली जात होती. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण आणि प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांनी परवानगी दिली आणि प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील सहाही दरवाजे २५ जून ते ३० जून या कालावधीत नियम आणि अटींसह पर्यटकांसाठी खुले झाले होते. या सहा दिवसांत गाभा क्षेत्रात पर्यटनासाठी एकूण ५७१ वाहने गेल्याची नोंद झाली आहे.



**सूत्र** – पंकज मोहरीर. 'ताडोब्यातील 'कोअर'ला पावसाळी सुट्टी; १ ऑक्टोबरपासून होणार खुले', maharashtratimes.com, ०१.०७.२०२१.

### ताडोबा अंधारीलगतच्या दोन गावांच्या पुनर्वसन प्रस्तावाची मुख्यमंत्र्यांकडून मागणी

चंद्रपूर जिल्ह्यात वाढलेली वाघांची संख्या आणि माणूस-वन्यजीव संघर्षांच्या घटनांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र वाढवण्यासाठी लगतच्या दोन गावांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मे महिन्यात झालेल्या बैठकीत वन विभागाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. पर्यटकांना आकर्षित करू शकतील अशी ठिकाणे निवडून तिथे जाणीवपूर्वक नैसर्गिक अधिवासांचा विकास करावा, जेणेकरून पर्यटकांना जंगलाचा अनुभव घेता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. उघड्या विहिरीत वाघासह अन्य प्राणी पडून त्यांचे मृत्यू होण्याच्या घटना रोखण्यासाठी

विहिरींना संरक्षक भिंत बांधावी व अन्य आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही ते म्हणाले.

**सूत्र** – 'राज्यात वाघांच्या संख्येत वाढ ; सध्या ३१२ वाघ', www.loksatta.com, २५.०५.२०२१.

## तुंगारेश्वर अभयारण्य

### तुंगारेश्वर अभयारण्यात सदानंद बाबा आश्रमाचे बेकायदा बांधकाम सुरूच

तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यात असलेल्या सदानंद बाबा आश्रमाकडून अभयारण्य परिसरात बेकायदा बांधकामे सुरूच आहेत, अशी पर्यावरणवाद्यांची तक्रार आहे. आश्रमाने तुंगारेश्वर अभयारण्यात केलेली बेकायदा बांधकामे पाडून टाकण्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. निकालाची अंमलबजावणी होऊन वर्ष उलटले आहे.

'कॉन्झर्वेशन एक्शन ट्रस्ट' (कॅट) या संस्थेचे पदाधिकारी २६ जून रोजी तुंगारेश्वर अभयारण्यात गेले होते. त्यावेळी त्यांनी पाहिले की आश्रमापर्यंत जाणारा रस्त्यावरून वाहतुकीला परवानगी नसतानाही भक्त आणि आश्रमाच्या पदाधिकाऱ्यांची वाहने या रस्त्याचा सर्रास वापर करत आहेत. खेरीज, बेकायदा बांधकाम पाडल्यानंतर आश्रमाच्या आवारात पुन्हा दोन नवी बांधकामे करण्यात आली आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालकांच्या अखत्यारित हा परिसर येतो. वनाधिकारी या ठिकाणी पाहणी करून आवश्यक कारवाई करतील, असे उद्यानाच्या संचालकांनी सांगितले आहे.

**सूत्र** – योगेश नाईक. 'Environmentalists complain ashram in Tungareshwar Wildlife Sanctuary constructing illegal extensions', www.indianexpress.com, २९.०६.२०२१.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### काळ्या बिबट्यापाठोपाठ नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात दिसली 'रस्टी स्पॉटेड कॅट'

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात काळ्या बिबट्यापाठोपाठ मार्जार कुळातील सर्वात लहान मांजर 'रस्टी स्पॉटेड कॅट' दोन पिल्लांसह दिसून आले आहे. दुर्मीळ असलेल्या या जातीच्या मादीची दोन पिल्लांसह छबी स्वयंचलित कॅमेऱ्यामध्ये आली आहे.

जून महिन्याच्या मध्यात व्याघ्र प्रकल्पाचा भाग असलेल्या नागझिरा अभयारण्यात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यामध्ये एक काळा बिबट्या मादीसह आढळून आला. प्रकल्प व्यवस्थापनाने अधिक अभ्यासासाठी या नोंदी 'वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'कडे पाठवल्या आहेत.

यापूर्वी ताडोबा आणि पेंच व्याघ्र प्रकल्पांमध्ये काळा बिबट्या दिसून आला आहे.

**सूत्र** - रेणुका धायबर. 'प्राणी प्रेमींसाठी आनंदाची बातमी, काळ्या बिबट्यानंतर आता 'या' जातीचं दर्शन', maharashtratimes.com, ०६.०७.२०२१.
'नागझिऱ्यात आढळला दुर्मीळ काळा बिबळया', maharashtratimes.com, ०६.०७.२०२१.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प/पेंच व्याघ्र प्रकल्प

### नागझिरा व पेंच व्याघ्र प्रकल्पांदरम्यानच्या क्षेत्रात तीन वाघांचा संचार

भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरी वन क्षेत्रातील चिखला नियतक्षेत्रात वाघिणीसह दोन बछड्यांचे अस्तित्त्व दिसून आले आहे. वन विभागाने लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात मे महिन्यात त्यांचे छायाचित्र आले आहे.

पेंच आणि नागझिऱ्याला जोडणारा हा वन्यजीव भ्रमणपट्टा आहे. तुमसर आणि मोहाडी तालुका मिळून वन विभागाची चार वन क्षेत्रे आहेत. यात तुमसर, नाकाडोंगरी, लेंडेझरी, जामकांजरी या क्षेत्रांचा समावेश आहे.

नाकाडोंगरी वन क्षेत्रात डोंगरी माईन, चिखला माईन ही मँगनिज क्षेत्रे आहेत. या भागात मध्य प्रदेशातून आलेले अनेक वाघ आहेत. गेल्या वर्षी याच परिसरात शिकारीचे प्रकरण उघडकीस आले होते. वीजप्रवाह वापरून शिकार करणारी टोळी पकडण्यात आली होती. या भागाला चिखला नियतक्षेत्र लागून आहे. त्यामुळे वन विभाग सावध झाला आहे.

**सूत्र** – 'भंडारा : वाघाचे तीन बछडे मृतावस्थेत सापडल्यानंतर तिथेच आढळले वाघिणीसह दोन नवीन बछडे!', www.loksatta.com, २१.०५.२०२१.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राण्यांचे उपचार केंद्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्याअभावी बंद

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत परतवाडा इथे वन्यजीवांसाठी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या उपचार केंद्रात चार महिने उलटून गेल्यावरही पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक झाली नाही. परिणामी, हे केंद्र बंद पडले आहे.

केंद्रातील शीघ्रकृती बचाव पथकही काढून घेण्यात आले आहे. त्यामुळे वन्यजीवांना आपात्कालीन सेवा उपलब्ध होत नाही. जानेवारी २०२१ पासून पशु वैद्यकीय अधिकारी नाही. या बाबी राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्याने प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांना पत्राद्वारे कळवल्या आहेत.

निसर्ग संरक्षण व वन्यजीव व्यवस्थापन योजनेंतर्गत २०१८-१९ मध्ये ७०,५६,९०० रुपये निधी खर्च करून हे केंद्र उभारण्यात आले आहे. त्यामध्ये वन्य प्राण्यांसाठी आठवड्याचे सर्व दिवस २४ तास औषधोपचार, शस्त्रक्रिया विभाग आदी सुविधा उभारल्या आहेत. मेळघाट व्याघ्र प्रतिष्ठानाकडे या केंद्राच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

**सूत्र** – अनिल कडू. 'मेळघाट व्याघ्र प्रतिष्ठानकडून वन्यजीवांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष', www.lokmat.com, २९.०५.२०२१.

### राष्ट्रीय बांबू अभियानाचा निधी मेळघाट प्रतिष्ठानाकडे पडून

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे सोपवलेले राष्ट्रीय बांबू अभियान बंद पडले आहे. बांबू प्रक्रिया युनिट अंतर्गत प्रशिक्षणासाठी खरेदी केलेली लाखो रुपयांची यंत्रे गोदामात पडून आहेत. त्याचबरोबर, प्रादेशिक वन विभागांसाठी असलेली यंत्रेही निर्धारित विभागांऐवजी व्याघ्र प्रकल्पातच पडून आहेत. अभियानांतर्गत उभारणे अपेक्षित असलेली बांबू नर्सरीसुद्धा अस्तित्त्वात आलेली नाही.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला वर्ष २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय बांबू अभियान राबवण्यासाठी ८३ लाखांचा निधी देण्यात आला. त्यात बांबू नर्सरीकरता ५० लाख, प्रक्रिया यंत्रणेकरता ३० लाख, शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक देण्याकरता तीन लाख रुपये दिले आहेत. त्यातील जवळपास १२ लाख रुपये यंत्रांच्या खरेदीवर खर्च झाले. उरलेले सुमारे ७१ लाख रुपये मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानाकडे वळवण्यात आले. मात्र, हा निधी गेली तीन वर्षे पडून आहे.

विधान परिषदेत प्रश्नोत्तरांमध्ये ही बाब उघडकीस आली असून वनाधिकाऱ्यासह संबंधितांकडून राष्ट्रीय बांबू अभियानाच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले आहे.

**सूत्र** – अनिल कडू. 'रेड्डींनी राष्ट्रीय बांबू अभियान धुळीस मिळविले', www.lokmat.com, ११.०५.२०२१.

### 'ट्रोपिझोडीअम विरिदुर्बिअम' कोळ्याच्या नराचे पहिल्यांदाच मेळघाटात दर्शन

मेळघाटात 'ट्रोपिझोडीअम विरिदुर्बिअम' या कोळ्याच्या जातीचा नर पहिल्यांदा दिसून आला आहे. या जातीचा नर ३.६ मिमी लांब व मादी ४.१ मिमी लांबीची असते. मादीची पहिली नोंद गुजरातमधील गांधीनगर इथे पालजजवळ अरण्य पार्कात २०१६ मध्ये प्रजापती व त्यांच्या सहकारी संशोधकांनी केली होती.

दर्यापुरातील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयातील स्पायडर रीसर्च लॅबोरेटरीतील प्रा. अतुल बोडखे, वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) या संस्थेतील डॉ. व्ही.पी. उनियाल व डॉ. शाजिया कासिन यांच्यासह कोळ्यांच्या संशोधनादरम्यान सुभाष कांबळे, डॉ. महेश चिखले, डॉ. गजानन संतापे व सावन देशमुख यांना हा नर कोळी दिसून आला. हे संशोधन WII च्या सहयोगाने आणि केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या आर्थिक साहाय्याने होत आहे.

**सूत्र** - 'जगातील पहिला 'ट्रोपिझोडिअम विरिदुर्बिअम' प्रजातीचा कोळी', www.loksatta.com, १८.०५.२०२१.
जयंत सोनोने. 'मेळघाटात सापडला जगातील पहिला ट्रोपिझोडिअम विरिदुर्बिअम नर', maharashtratimes.com, ०८.०५.२०२१.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### हिमालयातील गिधाडाची सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात नोंद

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील जंगली जयगड भागात गस्त घालत असताना वनक्षेत्रपाल स्नेहल मगर आणि वनरक्षक संतोष चाळके यांना ग्रिफन गिधाड आकाशात घिरट्या घालताना दिसले. गिधाडाच्या उजव्या पंखावर पक्षी अभ्यासकांनी नारिंगी रंगाचे अंकन केले आहे. त्यामुळे त्याच्याविषयी अधिक माहिती मिळवणे शक्य होणार आहे.

हे गिधाड तिबेट, कझाकिस्तान, उझबेकिस्तान, किर्गिझिस्तान, ताजिकिस्तान, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान ते भारतीय हिमालय, नेपाळ, भूतान ते पश्चिम चीन, मंगोलिया, दक्षिणेकडील युरोप, उत्तर आफ्रिका या भागात मुख्यत्वे आढळते. याचे सह्याद्रीतील दर्शन ही दुर्मीळ घटना आहे.

**सूत्र** - विजय पाटील. 'गिधाडाच्या दुर्मीळ प्रजातीचे 'सह्याद्री व्याघ्र' प्रकल्पात दर्शन!', www.loksatta.com, २७.०५.२०२१.
चैत्राली चांदोरकर. 'आनंदाची बातमी! सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दुर्मिळ ग्रिफॉन गिधाडाची नोंद', maharashtratimes.com, २६.०५.२०२१.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### आरे दुग्ध वसाहतीतील वनासाठी राखीव केलेल्या जागेचे वन विभागाकडे हस्तांतरण

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ असलेली आरे दुग्ध वसाहतीची जागा वनासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानुसार जून महिन्याच्या सुरुवातीला २८६.७३२ हेक्टर अधिसूचित जागेचा ताबा आरे दुग्ध वसाहतीने वन विभागास प्रत्यक्ष सोपवला.

आरेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बोरिवली तहसीलदार आणि नगरभूमापन अधिकारी मालाड यांच्या उपस्थितीत मुख्य वन संरक्षकांना जमिनीचा ताबा दिला. या संदर्भात राखीव वन क्षेत्राबाबत कलम ४ नुसार नागरिकांकडून सूचना आणि हरकती मागवण्यात येऊन त्यावर सुनावणीनंतर अंतिम अधिसूचना काढण्यात येणार आहे.

सप्टेंबर २०२० मध्ये राज्य शासनाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आरे इथली १२५.४२२ हेक्टर, गोरेगाव इथली ७१.६३१ हेक्टर आणि मरोळ मरोशी इथली ८९.६७९ हेक्टर इतकी जागा वन विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त मरोळ मरोशी गावातील ४०.४६९ हेक्टर जागा यापूर्वीच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यात देण्यात आली आहे.

**सूत्र** - अमित उजागरे. 'मुंबईच्या मधोमध विस्तीर्ण जंगल फुलविण्याचा मार्ग मोकळा', www.esakal.com, ०७.०६.२०२१.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान/तुंगारेश्वर अभयारण्य

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व तुंगारेश्वर अभयारण्यात अनेक ठिकाणी वाघोबाची देवळे

पट्टेरी वाघ, बिबट्या यांची पूजा करण्याची प्रथा संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व तुंगारेश्वर अभयारण्यातील पारंपरिक वारली समाजात आहे. त्यामुळे या परिसरात वाघोबाची अनेक देवळे असल्याचे दिसून आले आहे.

पट्टेरी वाघ, बिबट्या यांना वाघोबा म्हणून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वारली समाज त्यांचे पूजन करतो. त्यासाठी उभारलेली लहानशी देऊळसदृश १५० ठिकाणे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व तुंगारेश्वर अभयारण्याच्या परिसरात आढळली आहेत. माणूस आणि वाघ यांच्या सहअस्तित्त्वाचा हा पुरावा आहे.


रम्या नायर, ओंकार पाटील, निकीत सुर्वे, जॉन लिनेल आणि विद्या अत्रेय यांनी २०१८-१९ मध्ये प्रकाशित केलेल्या शोधनिबंधात ही बाब मांडली आहे. त्यांच्या या शोधनिबंधासाठी केलेल्या अभ्यासाबाबतचा लेख अलीकडे फ्रंटिअर्स इन कॉन्झर्वेशन सायन्स या नियतकालिकात प्रसिद्ध झाला. त्यामध्ये ही माहिती दिली आहे.

**सूत्र** – क्लॅरा लुईस. 'Mumbai: Ethnographic study of Warli tribe documents 150 Waghoba shrines', www.timesofindia.indiatimes.com, २७.०६.२०२१.



## राज्यस्तरीय बातम्या

### बुद्ध पौर्णिमेची प्राणिगणना कोविड साथीमुळे सलग दुसऱ्या वर्षी रद्द



राज्यात बुद्ध पौर्णिमेला होणाऱ्या वन्यप्राणी गणनेला सलग दुसऱ्या वर्षी कोविड साथीचा फटका बसला आहे.

या गणनेतील वन्यप्राण्यांची आकडेवारी अधिकृतपणे गृहीत धरली जात नाही. मात्र, प्रादेशिक वन विभाग या गणनेत सहभागी होण्यासाठी जंगलालगतच्या गावकऱ्यांना प्राधान्य देतो. एकही रुपया न घेता संधी देण्यात आलेले अनेक गावकरी गणनेनंतरही वन विभागाच्या संपर्कात राहून विभागाला मदत करतात. त्यामुळे जनजागृतीचा उद्देश साध्य होतो.

बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात पाणवठ्यावर येणाऱ्या प्राण्यांची शिकार करणे सहज शक्य आहे. मात्र, गणनेमुळे शिकाऱ्यांचे हे ध्येय साध्य होत नव्हते. यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यात मागील वर्षी शिकाऱ्यांनी गणना न झाल्याचा फायदा घेतला. पाणवठ्याशेजारी लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यामुळे ती घटना उघडकीस आली आणि तीन शिकाऱ्यांना अटक करण्यात आली (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक २ क्र. २*).

गेल्या वर्षी सात मे रोजी बुद्धपौर्णिमा होती. मात्र, २४ मार्चपासून देशभरात टाळेबंदी असल्याने ही गणना स्थगित करण्यात आली. यावर्षी २६ मे रोजी बुद्धपौर्णिमा होती, मात्र ३१ मे पर्यंत टाळेबंदी असल्याने यंदाही गणना स्थगित करण्यात आली.

**सूत्र** - 'बुद्धपौर्णिमेला होणाऱ्या वन्यप्राणी गणनेवर कोरोनाचे सावट', www.loksatta.com, २१.०५.२०२१.

### शिकारीसाठी लावलेल्या वीजेच्या तारा शोधण्यासाठी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या उपकरणाचा राज्यातील पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये वापर

वन्य प्राण्यांची शिकार करण्यासाठी लावलेल्या जिवंत विद्युततारांचा शोध घेणारी २० उपकरणे महाराष्ट्रातील पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये वापरण्यात येणार आहेत. ताडोबा अंधारी, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पांना प्रत्येकी चार, बोर व्याघ्र प्रकल्पाला तीन आणि मेळघाटाला पाच उपकरणे देण्यात आली आहेत.

'अटल इनोव्हेशन सेंटर' आणि आंध्र प्रदेशातील 'श्री कृष्णदेवराय विद्यापीठा'ने डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडियाच्या सहयोगाने २०१९ मध्ये एक स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत 'कुप्पम अभियांत्रिकी महाविद्यालया'च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी जिवंत विद्युतप्रवाह शोधण्याच्या उपकरणाची संकल्पना मांडली. त्यांना नमुन्यादाखल एक उपकरण तयार करण्यास सांगण्यात आले. २०२० मध्ये महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील जंगलात या उपकरणाची चाचणी करण्यात आली. या चाचणीनंतर या उपकरणात विजेरी असावी, ते कमी अंतरावरून वापरता यावे, उपकरण फारसे जड नसावे इ. सुधारणा सुचवण्यात आल्या. या सूचनांनुसार व्यावसायिक पातळीवर 'कुप्पम इलेक्ट्रो सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड' या स्टार्टअप कंपनीच्या माध्यमातून सुधारित उपकरण तयार करण्यात आले. अशा सुधारित २० उपकरणांचा नमुन्यादाखल वापर राज्यातील पाच व्याघ्र प्रकल्पांमध्ये केला जाणार आहे.

जिवंत विद्युतप्रवाह कुठे सोडण्यात आला आहे, हे या उपकरणाद्वारे तीन मीटर अंतरावरून शोधता येते. भ्रमणध्वनीच्या भारकानेदेखील हे उपकरण चार्ज होते आणि ११ ते १२ तास चालते. सध्या एका उपकरणाची किंमत १०,००० रु. इतकी आहे; मात्र, मोठ्या संख्येने विकत घेतल्यास एक उपकरण ८,००० रु. दरात मिळू शकते.

**सूत्र** – 'वीजतारांद्वारे होणाऱ्या शिकारीला आळा', www.loksatta.com, ०३.०७.२०२१.

विजय पिंजरकर. 'In a first, Nagpur forest department to use live wire detectors to check poaching', www.timesofindia.indiatimes.com, २५.०६.२०२१.

### कोळ्याच्या नव्या जातीला पोलीस कर्मचारी तुकाराम ओंबळे यांचे नाव

महाराष्ट्रात नव्याने सापडलेल्या कोळ्यांच्या दोनपैकी एका जातीला शहीद पोलीस कर्मचारी तुकाराम ओंबळे यांच्या सन्मानार्थ 'इसिअस तुकारामी' हे नाव देण्यात आले आहे.

ओंबळे यांनी मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यादरम्यान अंगावर २३ गोळ्या झेलत दहशतवादी कसाबला जिवंत पकडले. त्यांच्या बलिदानाची आठवण म्हणून त्यांचे नाव जातीला देण्यात आल्याचे संशोधक धृव प्रजापती यांनी सांगितले. दुसऱ्या जातीला प्रजापती यांचे मित्र कमलेश चोळके यांच्या स्मरणार्थ 'फिनटेल्ला चोळकेई' असे नाव देण्यात आले आहे.

**सूत्र** – 'अभिमानास्पद! कोळ्याच्या नव्या प्रजातीला शहीद वीर तुकाराम ओंबळे यांचं नाव', www.loksatta.com, २९.०६.२०२१.

### डॉ. माधव गाडगीळ यांच्या सन्मानार्थ बांबूच्या जातीचे नामकरण

सह्याद्रीतील मेस आणि माणगा म्हणून ओळखला जाणारा बांबू ही एकच जाती नसून दोन वेगवेगळ्या जाती आहेत. मेस या जातीला ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या सन्मानार्थ 'स्युडॉक्सिटेनानथेरा माधवी' हे नाव देण्यात आले आहे.

मेस आणि माणगा या दोन्ही जातींना आतापर्यंत 'स्युडॉक्सिटेनानथेरा स्टोकसी' हे एकच शास्त्रीय नाव होते. ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ डॉ. पी. तेताली यांनी अनेक वर्षांच्या निरीक्षणाधारे या दोन जाती असल्याचे स्पष्ट केले. या बाबतचा शोधनिबंध 'फायटोटॅक्सा' या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. तेताली यांना केरळच्या वन संशोधन

केंद्राचे डॉ. मुरलीधरन यांच्यासह अन्य संशोधकांनी सहकार्य केले.

**सूत्र** – 'डॉ. माधव गाडगीळ यांचे बांबूच्या प्रजातीला नाव', www.loksatta.com, १०.०५.२०२१.

## पश्चिम महाराष्ट्र

### अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील जंगलात ९७ शेकरू

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात कोथळे, तळे-विहीर, पाचनई, लव्हाळी, कुमशेत या भागात वन्यजीव विभागाने केलेल्या शेकरूंच्या गणनेत ९७ शेकरू (इंडियन जाएंट स्क्विरल) आढळून आले.

बुद्धपौर्णिमेची प्राणिगणना सलग दोन वर्षे कोविड-१९च्या साथीमुळे झाली नाही. मात्र, राजूर व भंडारदरा वन्यजीव क्षेत्रात वन विभागाने शेकरूंची गणना केली. कोथळे-कुमशेत-पाचनईच्या कारवीच्या बंबाळया रानात शेकरूंची २४४ नवी आणि १५२ जुनी घरटी आढळून आली आहेत. हे पाचनईचे जंगल शेकरूसाठी प्रसिद्ध असलेल्या भीमाशंकर अभयारण्यापासून सरळ रेषेत बरेच जवळ आहे.

**सूत्र** - 'अकोले तालुक्यातील जंगलात ९७ शेकरू', www.lokmat.com, ०६.०६.२०२१.


### कोरोना संसर्गाची शक्यता लक्षात घेऊन माणिकडोह निवारा केंद्रातील बिबट्यांची विशेष काळजी

हैदराबाद इथल्या प्राणिसंग्रहालयातील सिंहांना कोरोनाचा संसर्ग झाल्याचे दिसून आल्यानंतर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात असलेल्या माणिकडोह बिबट्या निवारा केंद्रातील ३२ बिबट्यांची विशेष काळजी घेण्यात येत आहे. गरज भासल्यास बिबट्यांची कोरोना चाचणी केली जाणार आहे.

दिवसभरातून तीन वेळा बिबट्यांच्या शरीराचे तापमान नोंदवले जाते. बिबट्यांना दिले जाणारे मांस उकळत्या पाण्यात ठेवून मग दिले जाते. बिबट्यांची विष्ठा आणि राहिलेल्या खाद्यपदार्थांची विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. बिबट्यांच्या पिजऱ्यांची जंतुनाशकाने दररोज सफाई करण्यात येत आहे. एखाद्या बिबट्यात कोरोना संसर्गाची लक्षणे आढळल्यास त्वरित त्याचे विलगीकरण करण्यात येणार आहे. विलगीकरणासाठी स्वतंत्र पिंजरे ठेवण्यात आले आहेत.

माणिकडोह निवारा केंद्राने तांत्रिक मदतीसाठी 'वाईल्डलाईफ एसओएस' या स्वयंसेवी संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. संस्थेतील आठ कर्मचारी आणि वन विभागाच्या चार कर्मचाऱ्यांचे कोविड प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे.

**सूत्र** – 'संसर्गाच्या छायेतील बिबट्यांची विशेष काळजी!', www.loksatta.com, १३.०५.२०२१.



## विदर्भ

### विदर्भातील भंडारा, गोंदियासह मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात सारस क्रौंच पक्ष्याचे अस्तित्त्व धोक्यात

महाराष्ट्राच्या भंडारा व गोंदिया जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात आणि त्याला लागून असलेल्या मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात आढळणाऱ्या सारस क्रौंच (सारस क्रेन) पक्ष्याचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे.


'सेवा' संस्था आणि वन विभागाने यंदा केलेल्या गणनेत भंडारा, गोंदिया व बालाघाट जिल्ह्यांत ८८ सारस क्रौंच पक्ष्यांची नोंद झाली आहे. १३ ते १९ जून या कालावधीत २३ चमूंनी गोंदिया जिल्ह्यातील किमान ८० ठिकाणी व बालाघाट जिल्ह्यात जवळपास ७० ठिकाणी

गणना केली. त्यात एकूण ८८ पक्ष्यांपैकी ४७ बालाघाट जिल्ह्यात, गोंदिया जिल्ह्यात ३९ तर भंडारा जिल्ह्यात दोन पक्षी दिसून आले. गेल्या वर्षीच्या गणनेत १०३ पक्षी दिसून आले होते. त्या तुलनेत यंदा ही संख्या १५ ने कमी झाली आहे.

पीक पद्धतीत बदल होऊन धानाऐवजी उसाची शेती सुरू होणे, पिकांवर रासायनिक खतांचा मारा यामुळे पक्ष्यांच्या अधिवासातील घटक बदलले. तसेच वीजेच्या तारांमध्ये अडकल्यामुळे होणारे मृत्यू, शिकार या कारणांमुळे सारस क्रौंच पक्ष्याची संख्या रोडावत आहे, असे पक्षी अभ्यासकांनी सांगितले.

**सूत्र** - राजू मस्के. 'सारस पक्ष्यांचे अस्तित्त्व धोक्यात', maharashtratimes.com, ०४.०७.२०२१.
विजय पिंजरकर. 'Sarus cranes number goes down in Gondia', www.timesofindia.indiatimes.com, २५.०६.२०२१.

### मध्य चांदा वन विभागाच्या प्रयत्नांमुळे विभागात यंदा उन्हाळ्यात माणूस-वन्यजीव संघर्ष आटोक्यात



चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वन्यजीव संघर्षात या वर्षी उन्हाळ्यात २२ ग्रामस्थांनी जीव गमावला. जिल्ह्यात बहुतांश भागात हा संघर्ष अधिक तीव्र होत असताना मध्य चांदा वन विभागात यंदाच्या मोहफूल, तेंदूपत्ता हंगामात वाघाच्या हल्ल्यात एकाही ग्रामस्थाचा बळी गेला नाही व वन्यजीवांच्या शिकारीची घटना घडली नाही. तसेच वणवा, जंगलतोड, उघड्या विहिरीत पडून वन्यजीवांचे मृत्यू, वन विभाग-गावकरी संघर्ष अशा एकाही घटनेची नोंद झालेली नाही. याचे श्रेय मध्य चांदा वन विभागाचे उपवसंरक्षक अरविंद मुंढे आणि या विभागात कार्यरत वन परिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक, वनपाल, वनमजूर अशा १६० वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आहे.

मध्य चांदा वन विभागाचे जंगल १ लाख १५ हजार हेक्टर क्षेत्रात आहे. त्यात जवळपास ३०० गावांचा समावेश आहे; तर विभागातील जंगलात २२ वाघ, बिबटे, अस्वले व इतर वन्यजीव आहेत.

वर्षभरापूर्वी मध्य चांदा वन विभागाच्या उप वन संरक्षक पदाची सूत्रे अरविंद मुंढे यांनी स्वीकारली. वन कर्मचारी व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन एकेक उपक्रम राबवण्यास मुंढे यांनी सुरुवात केली. मोहफुले व तेंदूपाने हंगामात गावकरी पहाटे ४ वाजताच जंगलात जात. तसेच, जास्तीत जास्त मोहफुले मिळवण्यासाठी समूहाने न जाता एकेकटे जात. उप वन संरक्षकांनी ग्रामस्थांना समूहाने आणि सोबत वन पथक घेऊन जंगलात जाणे बंधनकारक केले. आता दररोज वन कर्मचारी ग्रामस्थांच्या समूहाला सकाळी जंगलात घेऊन जातात. जंगलात जाण्याच्या वेळेतही बदल केला आहे. पहाटे सहा वाजेपर्यंत वाघ व इतर वन्यप्राणी जंगलात फिरत असतात, त्यामुळे सकाळी सातच्या सुमारास समूहाने जाऊन समूहासोबतच परतायचे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. जंगलात वाघाच्या शिकारीसोबतच हरीण, चितळ, रानडुक्कर यांच्या शिकारीचे प्रमाण अधिक आहे. यावर आळा घालण्यासाठी वन विभागाने मोहीम राबवली. मध्य चांदा वन विभागातील जंगलात १२० खुल्या विहिरी आहेत. या सर्व विहिरींना तात्पुरत्या स्वरूपात बांबूच्या ताटव्यांचे कुंपण केले.

वेळोवेळी दवंडी पिटणे, प्रचार, प्रसिद्धीमुळे लोकांमध्ये जनजागृती झाली आहे. वन विभागाच्या या उपक्रमांमुळे या वर्षी इतर विभागांत घटना घडल्या असल्या तरी मध्य चांदा वन विभागात माणूस-वन्यजीव संघर्ष आटोक्यात राहिल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**सूत्र** - रवींद्र जुनारकर. 'मानव-वन्यजीव संघर्ष रोखणारे 'मुंढे प्रारूप'', www.loksatta.com, ०८.०६.२०२१.

### भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरी वगळता राज्यात इतरत्र विहिरींना कठडे बांधण्याची योजना कागदावरच

जंगलालगतच्या शेतातील विहिरींना कठडे बांधण्यासाठी योजना अस्तित्वात आहेत. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीअभावी वाघ, बिबट्यासह इतर वन्यप्राणी विहिरीत पडून जखमी अथवा मृत होत आहेत.

जंगलातील व जंगलालगत असलेल्या शेतांतील विहिरींची माहिती प्रत्येक परिक्षेत्रातून पाठवण्यासंदर्भात सुमारे दहा वर्षांपूर्वी वन विभागाने पत्र काढले होते. त्यानंतर अशा विहिरींना कठडे बांधण्याची कामे तात्काळ पूर्ण करून अहवाल मागवण्यात आला होता. मात्र, अजूनही त्यावर अंमलबजावणी झाली नसल्याचे वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे दिसून आले आहे.

भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरीचे वन परिक्षेत्र अधिकारी नितेश धनविजय यांनी पुढाकार घेऊन विहिरींना कठडे बांधण्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. केंद्र सरकारची योजना व श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत त्यांनी दहा लाख रुपयांत सुमारे ३९ विहिरींना कठडे बांधले आहेत. २०१९-२० या कालावधीत या विहिरींवर कठडे बांधण्याचे काम पूर्ण झाले, तेव्हापासून आजतागायत या परिसरात वन्यप्राणी विहिरीत पडल्याची एकही घटना घडलेली नाही, असे धनविजय यांनी सांगितले.

दरम्यान, मे महिन्यात गराडा इथे वाघाच्या दोन बछड्यांचा विहिरीत पडून मृत्यू झाल्यावर भंडारा वन विभागाने गराडा गावाभोवतीच्या साडेपाच किमी परिसरातील ३५ विहिरींना जाळी लावण्याचे काम केले. कोका अभयारण्यालगतच्या ४० ते ५० गावांतील विहिरींना लोखंडी जाळी लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

**सूत्र** - 'योजना कागदावरच,पण नाकाडोंगरी पॅटर्न यशस्वी', www.loksatta.com, १८.०५.२०२१.

'वन्यप्राणी संरक्षणासाठी जंगलालगतच्या विहिरींना जाळीचे आच्छादन', www.lokmat.com,०८.०६.२०२१.


### यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यात विहिरीत पडलेल्या १५ नीलगायींची सुटका

यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यात इंद्रठाणा शिवारातील कठडा नसलेल्या एका विहिरीत रात्रीच्या वेळी १५ नीलगायींचा कळप पडला. विहीर मालकाच्या लक्षात येताच त्याने वन विभागाला या घटनेची माहिती दिली. नेर वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली वन कर्मचाऱ्यांनी तात्काळ बचाव कार्य सुरू केले. साधारण ३० फूट खोलीच्या या विहिरीत १०-१२ फूट पाणी होते. नेर वन विभागाने दोरखंडाची जाळी करून जाळीमध्ये एकेका नीलगायीला अडकवून जेसीबी यंत्राच्या मदतीने अखेर सर्व १५ नीलगायींना वर काढले. हे बचाव कार्य पाच तास चालले.

**सूत्र** - रवी राऊत. 'यवतमाळ: पाच तासांच्या प्रयत्नानंतर विहिरीत पडलेल्या १५ नीलगायींना जीवदान', maharashtratimes.com, १८.०४.२०२१.

## कोकण

### राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर वर्ष २०२०-२१ मध्ये ऑलिव रिडले कासवांच्या घरट्यांच्या संख्येत वाढ



कोविड-१९ च्या टाळेबंदीच्या काळात महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्यांवर मानवी वावर कमी झाल्यामुळे या काळात ऑलिव रिडले कासवांच्या घरट्यांची संख्या वाढल्याचे निरीक्षण वन विभागाने नोंदवले आहे.

वन विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२०-२१ या वर्षात कासवांच्या वीणीच्या हंगामात महाराष्ट्रातील विविध समुद्रकिनारी ऑलिव रिडले कासवाची ४७५ घरटी आढळली. त्यामध्ये ५०,७९९ अंडी होती व त्यातून २३,७०६ पिल्ले बाहेर पडली. वर्ष २०१९-२० मध्ये घरट्यांची संख्या २२८, अंडी २७,२५४ बाहेर पडलेल्या पिल्लांची संख्या १२,१४९ होती. त्याआधी वर्ष २०१८-१९ मध्ये २३३ घरटी, २३,१३१ अंडी आणि १२,६०१ पिल्ले बाहेर पडली होती.

रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर माणसांचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. त्यामुळे समुद्री कासवे अंडी घालण्यासाठी फारशी फिरकत नाहीत. मात्र, टाळेबंदीच्या काळात माणसांचा वावर कमी झाला आणि त्यांच्या पाठोपाठ येणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या संख्येतही घट झाली. त्यामुळे समुद्री कासवांची घरटी भक्षकांपासून मोठ्या संख्येने सुरक्षित राहिली असावीत, असे वन विभागाने म्हटले आहे.

**सूत्र** – लैला बावादाम. 'Olive ridley turtle nests almost double during lockdown in Maharashtra's beaches', www.frontline.thehindu.com, १९.०६.२०२१.

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील गावांमध्ये हत्तीची भीती; बागायतीचेही नुकसान

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग मोले गावात मे महिन्याच्या सुरुवातीला नर आणि मादी हत्तींसह दोन पिल्ले भर वस्तीत शिरली. मोले ग्रामस्थांनी हत्तीला जंगलात घालवण्याचे प्रयत्न सुरू केले. मात्र, या प्रयत्नांत हत्तीनेच पाठलाग केल्याने ग्रामस्थांना पळता भुई थोडी झाली.

काही दिवसांपूर्वी हेवाळे गावातील घाटीवडे, बांबर्डे, सोनावल या गावात दहशतीचे हत्तींनी धुमाकूळ घातला होता. त्यात आता मोले गावाची भर पडली आहे. रात्री १.३० वाजल्यानंतर पहाटेपर्यंत हत्तीचा वावर असतो त्यामुळे गावात भीतीचे वातावरण राहते.

या समस्येकडे वन वनविभाग, महसूल यंत्रणा, लोकप्रतिनिधी, आमदार-खासदार किंवा मंत्री कोणीही लक्ष देत नसल्यामुळे ग्रामस्थांनी सर्व यंत्रणेबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

मे महिनाअखेरीस हत्तीच्या कळपाने तिलारी धरण परिसरात असलेल्या केळी व माड बागायतीचे नुकसान केले आहे. वन विभागाकडे हत्तीचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतक-यांनी केली आहे.



**सूत्र** - 'हत्तीच्या कळपाकडून तिलारी धरण परिसरात केळी व माड बागायतीचे नुकसान', maharashtratimes.com, ०२.०६.२०२१.
रेणुका धायबर. 'भर वस्तीत हत्ती शिरल्याने ग्रामस्थांच्या जीवाला धोका, वन विभाग व लोकप्रतिनिधी मात्र नॉट रीचेबल', maharashtratimes.com, ०८.०५.२०२१.

## आंबोली गावात 'इस्चिमम' प्रजातीच्या गवताची नवी जाती

सिंधुदूर्ग जिल्ह्यात आंबोली घाटाच्या पायथ्याशी पावसाळी ओढ्यांमध्ये आणि आंबोली गावातील भातखाचरांमध्ये गवताची नवी जाती आढळून आली असून, तिला 'इस्चिमम आंबोलीएन्सिस' असे नाव देण्यात आले आहे.

पुण्यातील आघारकर संशोधन संस्थेतील डॉ. मंदार दातार, डॉ. शुभदा ताम्हनकर, डॉ. रितेश कुमार चौधरी आणि सारंग बोकील यांचा या संशोधनात सहभाग आहे. या संशोधनाबाबत शोधनिबंध 'फायटोटॅक्सा' या पत्रिकेमध्ये प्रसिद्ध झाला आहे.

'इस्चिमम' प्रजातीच्या ६१ जाती भारताच्या विविध भागात दिसून येतात. त्यातील बहुतांश जाती प्रदेशनिष्ठ असून त्या सह्याद्री डोंगररांगांमध्ये आढळतात.

**सूत्र** – 'गवताच्या नव्या प्रजातीचा आंबोलीमध्ये शोध',
www.loksatta.com, २३.०५.२०२१.

## सिंधुदूर्ग जिल्ह्यात वाघाच्या अस्तित्त्वाचा ठोस पुरावा; स्वयंचलित कॅमेऱ्याने टिपले वाघाचे छायाचित्र

कोल्हापूर वन विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात जंगलात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात वाघाचे त्याने शिकार केलेल्या गाईसह छायाचित्र आले आहे. पश्चिम घाटातील सह्याद्री पट्ट्यात वाघाच्या अस्तित्वाचा हा पुरावा आहे. त्यामुळे आठ राखीव वनक्षेत्रांतील वाघाचा भ्रमणमार्ग आता संरक्षित करण्यासाठी वन विभागाला आधार मिळणार आहे.

सह्याद्रीच्या रांगांमध्ये वाघाचे संचारमार्ग आहेत. साधारण दांडेली (कर्नाटक) - उत्तर गोव्यातील म्हादई अभयारण्य - तिलारी (सिंधुदुर्ग) - राधानगरी - विशाळगड - जोरजांभळी - महाबळेश्वर असा हा लांबलचक भ्रमणमार्ग आहे. यात सिंधुदुर्गातील आंबोली ते मांगेली हा संवेदनशील भाग आहे. याच्या संवर्धनासाठी उच्च न्यायालयात वनशक्ती या संस्थेने याचिकाही दाखल केली आहे. या मार्गामध्ये गेल्या अनेक वर्षात बैल, म्हैस, गाय अशा मोठ्या प्राण्यांची शिकार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. सावंतवाडी वन विभागाने २००९ या वर्षी सह्याद्रीच्या रांगांमध्ये वाघाचा संचार असल्याचे उघड मान्य केले होते. तिलारीलगत असलेल्या गोव्यातील वन क्षेत्रामध्ये वाघ असल्याचे पुरावे वेळोवेळी गोवा वन विभागाने पुढे आणले.

५ जानेवारी २०२० रोजी उत्तर गोव्यातल्या म्हादई अभयारण्याच्या जवळ असलेल्या गोळवली गावात मृत वाघाचे अवशेष मिळाल्याची घटना समोर आली होती. गोवा वन विभागाने केलेल्या तपासात तब्बल चार वाघांच्या मृत शरीरांचे अवशेष आढळून आले होते. यात एक मादी आणि तीन पिल्लांचा समावेश होता. मिळालेल्या या चारही वाघांवर विषप्रयोग झाल्याचा निष्कर्ष वन विभागाने काढला होता. डिसेंबर २०१९ अखेरीस ही घटना घडली होती आणि या प्रकरणात चार जणांना अटकही झाली होती .

वर्ष २०१५ आणि २०१६ पासून सिंधुदुर्गात नर, मादी आणि तीन पिल्ले अशा पाच जणांचे भ्रमण वेळोवेळी वन विभागाने लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यांत दिसले होते.

म्हादई अभयारण्यातील विषप्रयोगाच्या घटनेपूर्वी मार्च २०१८ मध्ये चांदोलीत वन विभागाच्या कॅमेऱ्यात वाघ दिसला होता. त्यानंतर २४ मार्च २०२१ रोजी एक वाघ म्हादई अभयारण्यातून पुढे सरकताना वन विभागाच्या कॅमेऱ्यात आढळून आला होता.

कर्नाटकातील दांडेली अभयारण्य, उत्तर गोव्यातील म्हादई अभयारण्य, विशाळगड, राधानगरी, तिलारी, जोरजांभळी, महाबळेश्वर अशा मोठ्या प्रदेशात वाघाचा संचार असल्याचे वन विभागाला कॅमेऱ्यांमुळे दिसून आले आहे.

म्हादई अभयारण्यात ठार झालेल्या मादी आणि तीन पिल्लांसह असलेला नर वाघ आणि यंदा २४ मार्च रोजी म्हादईत दिसलेला वाघ हा एकच असावा, अशी शक्यता वनाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे; तर याबाबत नेमकी खात्री करून घेण्याची गरज वन्यजीवप्रेमींनी व्यक्त केली आहे.

**सूत्र** – शिवप्रसाद देसाई. 'सह्याद्रीच्या रांगांमध्ये वाघाची डरकाळी; ट्रॅप कॅमेऱ्यामध्ये वाघाची शिकार क्लिक', www.esakal.com, ०४.०५.२०२१.
सुनील तांबे. 'सिंधुदुर्गाच्या जंगलात वाघाचा संचार, शिकार गाईसह कॅमेऱ्यात कैद', maharashtratimes.com, ३०.०४.२०२१.

## माणूस-बिबट्या संघर्ष

### राज्यात साडेचार महिन्यांत ८७ बिबट्यांचा मृत्यू

महाराष्ट्रात वर्ष २०२१ च्या सुरुवातीच्या साडेचार महिन्यांत ८७ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. ४७ बिबट्यांचा नैसर्गिक मृत्यू, तर ३३ बिबट्यांचा रस्ता-अपघातात बळी गेल्याची नोंद वन विभागाने केली आहे; दोन बिबट्यांची शिकार झाली असून, तीन बिबट्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

जुन्नर वन विभागाच्या माहितीनुसार, या प्रदेशात गेल्या काही वर्षांत बिबट्यांच्या अपघाती मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. तीन वर्षांत ३७ बिबट्यांचा मृत्यू झाला. १६ बिबट्यांचा विहिरीत पडून, तर पाच बिबट्यांचा ऊसाच्या शेतात पेटवलेल्या पाचटात होरपळून जीव गेला आहे. दहा बिबट्यांचा उपासमारीने, सहा बिबट्यांचा अन्य वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात; तर इतर कारणांनी नऊ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे.

विहिरींना कठडे नसल्याने भक्ष्याच्या शोधात विहिरीत पडून बिबट्यांचे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. तसेच, रस्ता-अपघातात सर्वाधिक मृत्यू राष्ट्रीय महामार्गावर झाले आहेत. २०१८ ते २०२१ या तीन वर्षांत ३६ बिबट्यांचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद वन विभागाकडे आहे.

‘वाइल्ड लाइफ प्रोटेक्शन सोसायटी ऑफ इंडिया’ या संस्थेच्या आकडेवारीनुसार, राज्यात जानेवारीपासून शिकार आणि बिबट्याचे अवयव ताब्यात घेतल्याची नऊ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. राज्यात वर्ष २०१९ मध्ये ११० बिबट्यांच्या मृत्यूंची नोंद झाली होती. वर्ष २०२० मध्ये हा आकडा १७२ इतका झाला.

बिबट्या आणि मनुष्य संघर्षावर तोडगा काढण्यासाठी वर्ष २०२० च्या अखेरीस ११ सदस्यांची समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला होता. त्यानुसार यंदा समिती नेमण्यात आली असून तिने राज्यस्तरीय कृती आराखडा तयार करणे अपेक्षित आहे.

**सूत्र** - राज्यात दर दोन दिवसाला एका बिबट्याचा मृत्यू, maharashtratimes.com, ०९.०६.२०२१.
धर्मेंद्र कोरे, अपघात बिबट्यांच्या जीवावर; गेल्या तीन वर्षांत झाले 'इतके' मृत्यू, maharashtratimes.com, २५.०५.२०२१.

### औरंगाबाद जिल्ह्यात चार वर्षांत १९ बिबट्यांचा मृत्यू

औरंगाबाद जिल्ह्यात मे २०१७ ते मे २०२१ या चार वर्षांत १९ बिबट्यांचा मृत्यू झाला. यातील काही मृत्यू रस्ता-अपघातात तर काही विहिरीत पडल्यामुळे झाले आहेत.

| परिक्षेत्र | बिबट्याच्या मृत्यूची तारीख |
|---|---|
| सोयगाव | ०६.०५.२०१७ |
| | ०२.०९.२०१७ |
| | १७.०५.२०१८ |
| | २७.१०.२०१९ |
| | १७.०४.२०२१ |
| | १८.०४.२०२१ |
| नागद | १८.०२.२०१८ |
| | २६.०५.२०१९ |
| | ०४.०४.२०२० |
| अजिंठा | १६.०८.२०१८ |
| खुलताबाद | ११.११.२०१८ |
| जालना दक्षिण | २९.११.२०१८ |
| औरंगाबाद | २६.०४.२०१९ |
| | १३.०४.२०२० |
| वैजापूर | २२.०४.२०२० |
| | १०.०९.२०२० |
| कन्नड | ०२.०४.२०२१ |
| | २४.०४.२०२१ |
| | ०१.०५.२०२१ |

**सूत्र** – ‘रवींद्र टाकसाळ. ‘औरंगाबाद जिल्ह्यात चार वर्षांत १९ बिबट्यांचा मृत्यू’, maharashtratimes.com, १८.०६.२०२१.

**नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी वन विभागात माणूस-बिबट्या संघर्षावर 'कार्बाईड गन'चा उपाय**

नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी वन विभागात शेतमळ्यातील वस्तू वापरून वन विभागाने कार्बाईड गन वापराचा प्रयोग यशस्वी केला आहे. साधा खडा आणि पाच-सहा थेंब पाणी टाकून या गनद्वारे मोठ्ठा आवाज करता येतो. अवघ्या दीडशे रुपयांत ही गन तयार होते. आवाजामुळे बिबट्या शेतमळ्यातून धूम ठोकत आहे.

बिबट्याला घरापासून दूर ठेवण्यासाठी घरांभोवती कुंपण लावणे, थाळ्या वाजवणे, लख्ख प्रकाश करून ठेवणे या उपाययोजनाही सुचवण्यात आल्या आहेत.

**सूत्र** – 'दीडशे रुपयांची गन, बिबट्या ठोकतोय धूम!', maharashtratimes.com, २०.०६.२०२१.

## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अहमदनगर | पाथर्डी | जवखेड खालसा इथे वन विभागाच्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद; तालुक्यात चार महिन्यांत पकडलेला चौथा बिबट्या | लोकसत्ता, २२.०६.२०२१ |
| | श्रीरामपूर | टाकळीभान-कारेगाव रस्त्यालगत मृत बिबट्या आढळला | लोकमत, ०४.०६.२०२१ |
| | पारनेर | कळस इथे रात्री बिबट्याच्या हल्ल्यात दोघे जखमी; सकाळी बिबट्या मृतावस्थेत आढळला, उपासमारीने मृत्यूचा अंदाज | महाराष्ट्र टाइम्स, २०.०५.२०२१ |
| अमरावती | चांदूर रेल्वे | मांजरखेड कसबा शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात गुराखी जखमी | लोकमत, ३१.०५.२०२१ |
| औरंगाबाद | कन्नड | हतनूरमध्ये बिबट्याचा जखमी अवस्थेतील बछडा आढळला | महाराष्ट्र टाइम्स, १४.०५.२०२१ |
| गोंदिया | सडक अर्जुनी | सिंधीपार वन परिक्षेत्रात बिबट्याची शिकार; दोघांना अटक | लोकसत्ता, १२.०५.२०२१ |
| नाशिक | इगतपुरी | खेडभैरवजवळ बिबट्याच्या हल्ल्यात तीन वर्षीय बालिका ठार | महाराष्ट्र टाइम्स, २४.०६.२०२१ |
| | देवळा | मेशी-डोंगरगाव रस्त्यालगत जखमी बिबट्या आढळला | महाराष्ट्र टाइम्स, ०७.०६.२०२१ |
| | निफाड | भुसे इथे एक बिबट्या जेरबंद; परिसरात आणखी दोन बिबट्यांचा वावर | महाराष्ट्र टाइम्स, २९.०६.२०२१ |
| | मालेगाव | कळवाडी परिसरात बिबट्या जेरबंद | महाराष्ट्र टाइम्स, १८.०६.२०२१ |
| पुणे | आंबेगाव | अवसरी बुद्रुक गावात दोन बछड्यांसह बिबट्याचा मुक्काम; पंधरवड्यात १०० कोंबड्या आणि एक शिकारी कुत्रा फस्त | ईसकाळ, १६.०६.२०२१ |
| | दौंड | देवकरवाडी-मगरवाडी हद्दीत बिबट्याच्या हल्ल्यात नऊ शेळ्या व एक मेंढी ठार | ईसकाळ, १६.०५.२०२१ |
| | जुन्नर | बेल्ह्यात बिबट्याचा शेतकऱ्यावर हल्ला | ईसकाळ, ११.०५.२०२१ |
| मुंबई | मुंबई उपनगर | न्यू दिंडोशी वसाहतीत दिवसाढवळ्या बिबट्याचा वावर; रहिवाशांमध्ये दहशत | लोकमत, १५.०६.२०२१ |
| यवतमाळ | उमरखेड | उमरखेड शहराजवळ अंबावन इथे मृत बिबट्या आढळला | लोकमत, २४.०२.२०२१ |
| सिंधुदुर्ग | सावंतवाडी | विहिरीत पडलेल्या बिबट्याची वन विभागाकडून सुटका | महाराष्ट्र टाइम्स, २२.०२.२०२१ |

## भारतात यंदा ८६ वाघांचा मृत्यू; महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

देशात वर्ष २०२१ मध्ये पहिल्या सहा महिन्यांत ८६ वाघांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली.

**राज्यनिहाय मृत्यू**

| | |
|---|---|
| महाराष्ट्र | २२ |
| मध्य प्रदेश | २६ |
| उत्तर प्रदेश | ८ |
| केरळ | ३ |
| तमिळनाडू | १ |
| उत्तराखंड | ६ |
| बिहार | २ |
| प. बंगाल | १ |
| कर्नाटक | ११ |
| असम | ४ |
| राजस्थान | २ |

वाघांच्या मृत्यूमध्ये मध्य प्रदेश पहिल्या, महाराष्ट्र दुसऱ्या तर कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. ३० जून २०२१ पर्यंत ८६ वाघांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. 'क्लॉ'- कन्झर्वेशन लेन्सेस अँड वाईल्डलाइफ या संस्थेने वाघांच्या मृत्यूसंदर्भात माहिती संकलित केली आहे. यात वाघांच्या अवयव जप्तीची नोंद नाही.

दरम्यान, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा (नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ऑथोरिटी) ने मात्र ७२ मृत्यूंची नोंद केली आहे. प्राधिकरणाच्या अहवालानुसार, पाच किंवा त्याहून अधिक वाघांच्या अवयवांच्या जप्तीची प्रकरणे आहेत.

२०२० या वर्षात वाघांचे ९८ मृत्यू नोंदवण्यात आले. त्यापैकी ५६ मृत्यू जून २०२० पर्यंत म्हणजेच पहिल्या सहा महिन्यांतील होते. २०१९ या संपूर्ण वर्षांत वाघांच्या मृत्यूची ८४ प्रकरणे नोंदवण्यात आली. सलग तीन वर्षांच्या आकडेवारीवरून वाघांचा मृत्युदर वाढत चालल्याचे स्पष्ट होत आहे. या वर्षी पहिल्या तीन महिन्यांतच संपूर्ण भारतात ३९, तर सहा महिन्यांत ८६ वाघ मृत्युमुखी पडले.

**सूत्र** – 'सहा महिन्यांत ८६ वाघांचा मृत्यू',
www.loksatta.com, १३.०७.२०२१.

## विदर्भातील कृषी क्षेत्र वाघांना अनुकूल

विदर्भातील ग्रामीण भागातील कृषी क्षेत्र वाघांच्या हालचालीसाठी अनुकूल ठरत आहे. वाघांचे विदर्भाच्या जमिनीवरील भ्रमणमार्ग यावर 'वाईल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' आणि महाराष्ट्र वन विभागाने केलेल्या अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे.

या अभ्यासानुसार, सुमारे ९७,३२१ चौ. किमी क्षेत्रापैकी ३७ ,०६७ चौ. किमी क्षेत्र वाघांचे भ्रमणमार्ग म्हणून ओळखले गेले आहेत. यात ३३१ वाघांची आश्रयस्थाने आहेत. ज्या ठिकाणी वाघांचे भ्रमणमार्ग उत्तम आहेत, त्या ठिकाणी व्याघ्रभ्रमंतीचे प्रमाणही जास्त असल्याचे दिसून आले आहे. आता हे क्षेत्र भ्रमणमार्ग व्यवस्थापन योजनेअंतर्गत आणण्याचे आणि ते वृद्धिंगत करण्याचे आव्हान वन विभागासमोर आहे.

या अभ्यासामुळे माणूस-वन्यजीव संघर्षाचे व्यवस्थापन, भ्रमणमार्गाचे संरक्षण आणि विदर्भात ज्या भागातून वाघ रस्ते ओलांडतात तिथे उपाययोजना या बाबींवर वन विभागाने अधिक जागरुक राहून लक्ष देण्याची आणि स्थानिक प्रशासन व लोकसहभागाने नियोजन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

**सूत्र** – 'वाघांच्या संचारक्षेत्राचा विस्तार',
www.loksatta.com, ०७.०६.२०२१.

## गुहेत कोंडून जिवंत जाळून वाघिणीची शिकार; आरोपींना अटक; अटक अन्यायकारक असल्याचा ग्रामस्थांचा दावा

यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव आणि मुकूटबन वन परिक्षेत्रांमध्ये मार्च आणि एप्रिल महिन्यांत वाघाच्या शिकारीच्या दोन घटना उघडकीस आल्या होत्या. या प्रकरणांमध्ये पोलीस आणि वन विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत आठ आरोपींना अटक झाली आहे.

मुकूटबन वन परिक्षेत्रात २५ एप्रिल रोजी वाघिणीला गुहेत कोंडून आग लावून मारण्यात आले.

मांगुर्ला नियतक्षेत्रात नाल्याला लागून असलेल्या गुहेत वन रक्षकाला वाघीण मृतावस्थेत आढळून आली. गळ्यात तारेचा फास अडकल्याच्या आणि अणकुचीदार हत्याराने मारल्याच्या खुणा तिच्या शरीरावर दिसून आल्या. वाघिणीचे पंजेही कापून नेल्याचे दिसून आले. गुहेच्या तोंडाशी आग लावल्याचे जळलेल्या लाकडांमुळे लक्षात आले.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी अन्य डॉक्टरांसह वाघिणीचे शवविच्छेदन केले. ही वाघीण चार वर्षांची असून गर्भवती होती व तिच्या पोटात चार बछडे होते.

या प्रकरणी प्राथमिक वन गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास करून वन विभागाने १९ जून रोजी पाच आरोपींना झरी तालुक्यातील वरपोड इथून अटक केली.

दरम्यान, आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या पथकात ३०० वन रक्षक व १०० पोलिसांचा ताफा होता. कोणत्याही पुराव्याशिवाय या पथकातील अधिकाऱ्यांनी आरोपींच्या घरात घुसून त्यांना व त्यांच्या कुटुंबातील महिलांना मारहाण केली आणि पाच व्यक्तींना विनाकारण अटक केली, असा आरोप वरपोड ग्रामस्थांनी केला आहे. या वाघिणीच्या शिकारीसंदर्भात वन विभागाला दोन महिन्यांनंतरही कोणताही पुरावा न सापडल्याने निरपराध ग्रामस्थांना या प्रकरणात गोवण्यात आले आहे, असे ग्रामस्थांनी मुकुटबन ठाणेदारांकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

तसेच, या कारवाई प्रकरणी पांढरकवडा वन विभागासह मुकुटबन वन परिक्षेत्रातील अधिकारी, कर्मचाऱ्यांवर अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रोसिटी) गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

गावात कारवाईच्या वेळी नेमके काय घडले ते चौकशीअंती स्पष्ट होईल, असे मुकूटबन पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांनी सांगितले.

मात्र, वरपोड हे गाव वन्यजीवांच्या शिकारीसाठी कुप्रसिद्ध आहे, शिकारीविरोधातील कारवाई टाळण्यासाठी ग्रामस्थ आरोप करत असून हे आरोप निराधार आहेत; खेरीज, कारवाईच्या वेळी आरोपींना पकडण्यासाठी ग्रामस्थांनी कोणतेही सहकार्य केले नाही, उलट वन व पोलीस विभागाच्या पथकावर दगडफेक केली, असेही मुकूटबन वन परिक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**सूत्र** - रवी राऊत. 'वनविभागाच्या पथकाकडून महिलांना मारहाण'; गावकऱ्यांचा आरोप', maharashtratimes.com, २२.०६.२०२१.
मानसी क्षीरसागर. 'गर्भवती वाघिणीला गुहेत कोंडून जिवंत जाळले; पायाचे पंजेही कापून नेले', maharashtratimes.com, २६.०४.२०२१.



## यवतमाळ जिल्ह्यातील झरी वन परिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात दोन जखमी

यवतमाळ जिल्ह्यातील झरी वन परिक्षेत्रातील मांडवी नियतक्षेत्रात मे महिनाअखेरीस वाघाच्या हल्ल्यात दोन शेतकरी जखमी झाले.

हे दोघे दुपारी बैलांना पाणी पाजण्यासाठी जुनोनी शिवारातील चाटवण नाल्यावर गेले. वाघाची चाहूल लागल्यामुळे बैल पळून गेले आणि त्याचवेळी वाघाने या दोन शेतकऱ्यांवर हल्ला चढवला. दोघांच्याही ओरडण्याने लगतच्या शेतातील शेतकरी मदतीस धावून आले तेव्हा वाघ पळून गेला. गेल्या दीड वर्षांपासून या परिसरात

वाघाची दहशत असून काही दिवसांपूर्वीसुद्धा या परिसरात वाघाने दोघांवर हल्ला केला होता.

**सूत्र** - सुनील तांबे. 'वाघाच्या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी; झरी वनपरिक्षेत्रातील घटना', maharashtratimes.com, २२.०६.२०२१.

### गडचिरोली जिल्ह्यात आठवडाभरात वाघाच्या हल्ल्यांत तीन महिला ठार



गडचिरोली जिल्ह्यातील दिभना इथली महिला १८ मे रोजी रानभाज्या गोळा करण्यासाठी जंगलात गेलेली असताना वाघाच्या हल्ल्यात ठार झाली. ही घटना पोर्ला वन परिक्षेत्राच्या हद्दीत घडली.

पोर्ला वन परिक्षेत्रातील गोगाव-महादवाळी जंगलात १० मे रोजी तेंदूपाने गोळा करणाऱ्या दोन महिलांवर वाघाने हल्ला केला होता. सकाळी आठ वाजताच्या सुमारास झालेल्या या हल्ल्यात दोन्ही महिलांचा मृत्यू झाला.

या दोन्ही घटना चारपाच किलोमीटर अंतरात घडल्या आहेत. वन विभागाने या परिसरात गस्त वाढवून गावकऱ्यांना शेतात तसेच गावाला लागून असलेल्या जंगलात न जाण्याच्या सूचना दिल्या होत्या.

**सूत्र** - गजानन झिलू सावंत. 'गडचिरोलीत वाघाची दहशत; आठ दिवसांत तीन महिलांना बनवले भक्ष्य', maharashtratimes.com, १९.०५.२०२१.
'रोजगाराच्या शोधात गेलेल्या दोन महिलांवर वाघाचा हल्ला, क्षणात गमावला जीव', maharashtratimes.com, १०.०५.२०२१.

### चंद्रपूर जिल्ह्यात यंदा माणूस-वाघ संघर्ष अधिक तीव्र

चंद्रपूर जिल्ह्यात चालू वर्षात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांत ठार झालेल्यांची संख्या २१ झाली आहे. यात वाघांच्या हल्ल्यांत ठार झालेल्यांची संख्या जास्त आहे. दोन हल्ले बिबट्याने, तर एक हत्तीने केला आहे.

काही ठळक घटना पुढीलप्रमाणे -

| घटना | तारीख |
|---|---|
| ताडोब्याच्या बफर क्षेत्रातील पळसगावात वाघाने केलेल्या हल्ल्यात विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या वन रक्षकासह एक ग्रामस्थ जखमी | २४.०६.२०२१ |
| ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात मोहर्ली वन परिक्षेत्राच्या आंबेगड नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक १३८ मध्ये वाघाच्या हल्ल्यात एक व्यक्ती ठार | १२.०६.२०२१ |
| दक्षिण ब्रह्मपुरी वन परिक्षेत्राच्या वांद्रा नियतक्षेत्रात तेंदूपाने गोळा करण्यासाठी गेलेली व्यक्ती वाघाच्या हल्ल्यात ठार | २६.०५.२०२१ |
| ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात मरोडा इथल्या एका व्यक्तिचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू | २३.०५.२०२१ |
| ब्रह्मपुरी वन विभागातील सिंदेवाही वन परिक्षेत्रातील पेंढरी नियतक्षेत्र, भद्रावती वन परिक्षेत्रातील चिपराळा नियतक्षेत्र आणि सावली वन परिक्षेत्रातील पाथरी नियतक्षेत्र या तीन ठिकाणी झालेल्या वाघांच्या हल्ल्यांत दोन महिला व एक वृद्ध ठार; गेवराच्या जंगलात एक वन रक्षक वाघाच्या हल्ल्यात जखमी | २०.०५.२०२१ |

**सूत्र** – 'चंद्रपूरात वाघाच्या हल्ल्यात आणखी एक नागरिक ठार', maharashtratimes.com, २७.०५.२०२१.
'नाल्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या वाघाची नजर त्या व्यक्तीवर गेली अन्...',
maharashtratimes.com, २४.०५.२०२१.
'चंद्रपुरात वाघाच्या हल्ल्यात दोन महिलांसह तीन ठार', maharashtratimes.com, २०.०५.२०२१.
रवींद्र जुनारकर. 'चंद्रपुरात वाघाची दहशत; एकाच दिवशी हल्ल्यात तिघांचा मृत्यू, १ जखमी!',
www.loksatta.com, १९.०५.२०२१.
पंकज मोहरीर. 'साडेसहा वर्षांत वन्यजीवांच्या हल्ल्यात ३८५ लोकांचे बळी', maharashtratimes.com, १७.०६.२०२१.
'ताडोबात वाघाच्या हल्ल्यात एक ठार; या वर्षात आतापर्यंत २१ जणांचा बळी',
maharashtratimes.com, १२.०६.२०२१.



## राष्ट्रीय बातम्या

### केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने १९२७ च्या वन कायद्यात सुधारणा करण्यासाठी निविदा मागवल्या

भारतीय वन कायदा १९२७ (वन कायदा) मध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने कायदेतज्ज्ञांच्या कंपन्या, संस्था-संघटनांकडून निविदा मागवल्या आहेत.

वन कायद्यातील सुधारणा या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करण्याचा सरकारचा मानस आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक, पुरेसे अनुभवी तज्ज्ञ अद्याप मिळालेले नाहीत, असे मंत्रालयातील अधिकाऱ्याने सांगितले. मंत्रालयाला कायद्याच्या अभ्यासाबरोबर न्यायालयीन प्रक्रियेचा अनुभव असलेले तज्ज्ञ अपेक्षित आहेत.

ब्रिटिशकालीन वन कायद्यात कालानुरूप सुधारणा सरकारला अपेक्षित आहेत. त्यामध्ये काही लहान गुन्ह्यांचे स्वरूप तपासून त्यांना गुन्हा न मानणे, लहान वन गुन्ह्यांबाबतीतील न्यायालयीन प्रक्रिया वेगवान करणे, शिक्षांचे स्वरूप बदलणे, सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून व्यवसाय करण्यासाठी या कायद्याशी संबंधित प्रक्रिया सोपी करणे अशा बाबींचा समावेश आहे.

यापूर्वी वर्ष २०१७ आणि २०१९ मध्ये मंत्रालयाने वन कायद्याचे सुधारित मसुदे जाहीर केले होते. मात्र, त्याला आदिवासी कल्याणकारी स्वयंसेवी संस्था, कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतल्यामुळे ते मसुदे रद्द ठरवण्यात आले.

**सूत्र** – जयश्री नंदी. 'Govt. moves ahead with plan to amend Indian Forest Act, www.hindustantimes.com', २८.०६.२०२१.

### वन कर्मचाऱ्यांना पहिल्या फळीतील कोविड योद्ध्यांचा दर्जा देण्याची मागणी

कोविड साथीच्या काळात गेले वर्षभर वन विभागातील कर्मचारी आपली जबाबदारी पार पाडत असताना त्यांच्यातील अनेकजण कोरोनाबाधित झाले आणि काहीजण कोविड-१९मुळे मृत्युमुखीही पडले. मात्र, वन विभागाचे काम सुरूच आहे, हे लक्षात घेऊन पोलीस आणि महसूल विभागांप्रमाणेच वनकर्मचाऱ्यांना देखील पहिल्या फळीतील योद्ध्यांचा दर्जा देऊन त्यांना आरोग्यसुविधा पुरवाव्यात, असे पत्र भारतीय वन सेवा असोसिएशनने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठवले आहे.

वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी सरकारी निर्देशांचे पूर्ण पालन करून टाळेबंदीच्या काळातही सक्रीय होते. या काळात वनाधारित समुदायांना मदत करणे, वन व वन्यजीवविषयक बेकायदा कृतींना आळा घालण्यासाठी वन विभाग कार्यरत राहिला आहे. मात्र अजूनही देशातील

राज्यांनी त्यांना पहिल्या फळीतील योद्ध्याचा दर्जा दिला नाही. देशात भारतीय वन सेवेतील सुमारे तीन हजाराहून अधिक अधिकारी व २५ हजाराहून अधिक क्षेत्रीय कर्मचारी आहेत. हे आरोग्य सुविधांपासून व लसीकरणापासून वंचित आहेत. त्यांना पहिल्या फळीतील योद्धयाचा दर्जा दिल्यास काम करण्यास आणखी बळ येईल, असे या पत्रात म्हटले आहे.

**सूत्र** – 'वन कर्मचाऱ्यांना 'फ्रंटलाईन वर्कर'चा दर्जा देण्याची मागणी', www.loksatta.com, १६.०५.२०२१.




## आंतरराष्ट्रीय बातम्या

### माणूस-वन्यजीव संघर्षाची व्याप्ती जगभर; संरक्षित क्षेत्र अवघे ९.६७ टक्के: अहवाल


भारतातील वाघांच्या वावराचा ३५ टक्के प्रदेश, आफ्रिकी सिंहाच्या वावराचा ४० टक्के; आफ्रिकी आणि आशियाई हत्तींच्या वावराचा ७० टक्के प्रदेश संरक्षित क्षेत्राबाहेर आहे. वाढत्या माणूस-वन्यजीव संघर्षाचा अभ्यास करून 'डब्ल्यू. डब्ल्यू. एफ.' ही आंतररष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि संयुक्त राष्ट्रसंघाचा पर्यावरण संरक्षण विभाग – 'यू. एन. ई. पी.' यांनी ही निरीक्षणे नोंदवली आहेत.

या अभ्यासावर आधारित अहवाल 'ए फ्युचर फॉर ऑल – ए नीड फॉर ह्युमन-वाइल्डलाईफ कोएक्झिस्ट्न्स' (सर्वांच्या भविष्यासाठी माणूस-वन्यजीव सहअस्तित्त्वाची गरज) या नावाने नुकताच प्रसिद्ध झाला. त्यानुसार, जगभरात जमिनीवरील आणि समुद्रातील संरक्षित क्षेत्रांचे क्षेत्रफळ पृथ्वीच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत अवघे ९.६७ टक्के आहे. तसेच, माणूस-वन्यजीव संघर्षाची व्याप्ती ही चीनमध्ये खाद्य व पाण्याच्या शोधात शेतात शिरणाऱ्या हत्तींपासून ते अमेरिकेतल्या इडाहो इथे गुराढोरांची शिकार करणाऱ्या लांडग्यांपर्यंत जगभरात सर्वत्र पसरलेली आहे; आणि जगातील काही मोठ्या जातींच्या दीर्घकालीन अस्तित्त्वाला असलेला हा सर्वात मोठा धोका आहे.

भारतात वाढती लोकसंख्या, रूढ संकल्पनेनुसार विकसित होण्याचा दबाव, जमीन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीला असणारी प्रचंड मागणी आणि त्यातून होणारे वन्यजीव अधिवासाचे तुकडे, ऱ्हास यामुळे माणूस-वन्यजीव संघर्षाची तीव्रता वाढत असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

विविध रोगांच्या साथींचे वाढते प्रमाण हा माणूस-वन्यजीव संघर्षाचाच एक परिणाम असल्याकडे या अहवालाने लक्ष वेधले आहे. कोविड-१९ ला कारणीभूत विषाणूसह तत्सम विविध विषाणूंचा उगम वन्यप्राण्यांमध्ये असून, माणूस व वन्यजीव अतिजवळ आल्यामुळे हे विषाणू प्राण्यांमधून माणसांमध्ये आणि त्याचप्रमाणे माणसांमधील विषाणूंचे संक्रमण वन्यजीवांमध्ये होण्याच्या शक्यता वाढल्या आहेत, असे या अहवालात म्हटले आहे.

**सूत्र** – इशा रॉय. 'WWF-UNEP report: 35% of tiger ranges outside protected areas', indianexpress.com, १०.०७.२०२१.




NOW AVAILABLE

## The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by
Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




<u>**Contents:**</u>

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -_A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (Shiba Desor); 4) Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line drawings by Ashvini Menon

For copies at 20% discount write to psekhsaria@gmail.com

## महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र सवलत योजना

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'ची वार्षिक वर्गणी रुपये १५०/- भरा आणि
'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' हे महाराष्ट्रातील वन्यजीवविषयक बातम्या व माहितीचे संकलन असलेले पुस्तक निम्म्या किमतीत मिळवा.

किंवा

रुपये ३५०/- भरा आणि 'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' पुस्तकासह आणि 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' किंवा 'Protected Area Update' यापैकी एका वार्तापत्राचे वर्षभराचे सदस्यत्व घ्या.

'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' या पुस्तकाविषयी अधिक माहितीसाठी वरील चौकट पाहा.

पुस्तकाच्या परीक्षणासाठी पाहा -
(मराठी) https://marathi.thewire.in/author/parikshit-suryavanshi (लेखक - परीक्षित सूर्यवंशी)
(इंग्रजी) https://india.mongabay.com/2020/06/book-review-good-information-data-and-peoples-support-is-needed-for-conservation/ (लेखक – असद रहमानी)

अधिक माहितीसाठी संपर्क psekhsaria@gmail.com किंवा marathipaupdate@gmail.com

# दृष्टीकोन

## जैवविविधता कायदा आणि वन्यजीव संरक्षण

जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. आजच्या या वेगवान युगामध्ये सतत नवनवीन शोध लागत आहेत व आपले जीवनमान सातत्याने उंचावत आहे. मात्र, याचा अनिष्ट परिणाम हा असंरक्षित क्षेत्रातील जैवविविधता, तिचे संरक्षण व संवर्धन यांच्यावर होत आहे. खरे तर लोकसहभागातून जैविक विविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न आजवर अनेक सरकारी विभागांमार्फत, अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. यांतून मिळालेले यश हे वेगवेगळ्या प्रमाणात आहे. तरीदेखील यातून एक बाब निश्चितपणे सिद्ध झाली आहे ती अशी की 'लोकसहभागाशिवाय असंरक्षित क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन यशस्वी होऊ शकत नाही'.

'जैविक विविधता कायदा' २००२ साली भारतात लागू झाला. हा कायदा स्थानिक पातळीवरील जैविक विविधतेच्या संरक्षण आणि संवर्धनाकरता प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यात प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला स्थानिक पातळीवर 'जैवविविधता व्यवस्थापन समिती' स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत स्तरावरील जैवविविधता व्यवस्थापन समितीला महाराष्ट्र शासनाने २ मे २०१६ रोजी आदेश जारी करून विकास समिती म्हणून मान्यता दिली आहे. या समित्यांना आपापल्या गावातील जैवविविधतेचे व्यवस्थापन आणि शाश्वत वापर करण्याचे संपूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे स्थानिक भागातील सर्व जैविक साधनसंपत्तीची नोंद गावपातळीवर करायची; या विषयातील माहीतगार व्यक्ती, वैदू इत्यादींकडून जैविक साधनसंपत्तीविषयी माहिती संकलित करून त्यांच्या नावानिशी लिहून ठेवायची. या लिखित माहितीला 'लोक जैवविविधता नोंदवही' असे संबोधण्यात आले आहे.

या कायद्यांतर्गत एकात्मिक पद्धतीने जैवविविधतेचा विचार करण्यात आला आहे. जंगल किंवा वन क्षेत्र, वन्यजीव व त्यांच्या नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण व संवर्धन याबरोबर शेतीतील मूळ वाणे व त्यांची सद्यस्थिती, पशुपालन व त्या संदर्भातील देशी जातींची माहिती, औषधी वनस्पती व त्याच्या वापराबाबत पारंपरिक ज्ञान, रानभाज्या व पिकांच्या मूळ जंगली जाती यांची माहिती, ग्रामक्षेत्रातून व्यावसायिक कारणांकरता गोळा केल्या जाणाऱ्या वनोपजांची नोंद करणे व त्याचा समितीद्वारे जैविक विविधता कायद्यांतर्गत व्यवहार करणे, वनोपजांचा शाश्वत वापर, गवताळ प्रदेशांचे तसेच चराई कुरणांचे योग्य नियोजन आणि नियमन करणे; पूर्वापार चालत आलेल्या पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या परंपरांचे पुनरुज्जीवन करणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे गावासाठी पुढील तीन ते पाच वर्षांकरता जैवविविधता संरक्षण-संवर्धनावर आधारित विकास आराखडा तयार करणे हे सर्व अधिकार 'जैवविविधता व्यवस्थापन समिती'ला आहेत.

जैविक विविधता कायदा हा अस्तित्त्वात असलेल्या सर्व कायद्यांबरोबर लागू असल्याने याचे क्षेत्र हे केवळ जंगल असलेल्या जमिनीपुरते मर्यादित नाही; तर हा कायदा खाजगी, औद्योगिक, निवासी व सरकारी क्षेत्रांनाही लागू आहे. यामुळेच लोकसहभागातून संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने हा कायदा म्हणजे वरदान आहे. असंरक्षित क्षेत्रातील वन्यजीव संरक्षणाकरता गावांच्या लोक जैवविविधता नोंदवह्या या त्या त्या गावांच्या परिसरात आढळणाऱ्या वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरता उपयोगी ठरतील. या माहितीच्या आधारे गावातील वन्यजीवांच्या अधिवासांचे संवर्धन करता येऊ शकते. आपण हा कायदा जेवढा अधिक प्रमाणात समजून घेऊ तेवढा आपला सहभाग असंरक्षित क्षेत्रातील वन्यजीवांच्या संरक्षणामध्ये वाढू शकेल हे निश्चित.

- **डॉ. राहुल मुंगीकर**
सदस्य, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ
rahul.mungikar76@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004